**अतितात्काळ/कालमर्यादा**
क्र.अपोमसं/प्रशि/पोशि भरती/विधी निदेशक/०४/२०२५
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१
दि. २१/०४/२०२६.

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन,
नवीन प्रशासकीय भवन, १९ वा मजला,
मुंबई ४०००३२.

| | |
|---|---|
| **संदर्भ :-** | १) शासन निर्णय, गृहविभाग, क्र.अेपीओ-३१०६/प्र.क्र.२२७/पोल-३, दि. २१.८.२००६,<br>२) शासन निर्णय, गृहविभाग, क्र.अेपीओ-३११०/प्र.क्र.४२८/पोल-३, दिनांक १५.६.२०११,<br>३) शासन निर्णय, गृहविभाग, क्र.एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल १०, दिनांक १५.९.२००६,<br>४) शासन निर्णय, गृहविभाग, क्र.एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, दिनांक २६.६.२००७.<br>५) शासन निर्णय, गृहविभाग, क्र. डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१० दि.२१.०८.२०१८ |
| **विषय :-** | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिपत्याखालील पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये विधी निदेशकांच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूका करणेबाबत. |

---------------

महोदय,

उपरोक्त शासन निर्णयानुसार, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिपत्याखालील पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये विधी निदेशक यांची ५२ पदे कंत्राटी पध्दतीने या कार्यालयामार्फत भरावयाची आहेत.

२. उपरोक्त रिक्त पद कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबतची जाहिरात दैनिक वृत्तपत्रामध्ये दि.२३.०४.२०२६ रोजी द्यावयाची आहे. जाहिरातीचा मसुदा सोबत सादर केला आहे. तरी सदरहू जाहिरात देण्याबाबत सहाय्यक संचालक (जाहिरात) यांना सुचित करावे अशी आपणास विनंती आहे.

३. वर नमुद पदांसाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांच्या सोयीसाठी आवेदन अर्जाचा नमुना, रिक्त पदांचा तपशील तसेच माहितीपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचे आहे. त्याबाबतचे मसुदे सोबत सादर केले आहेत. तरी सदरहू माहिती शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २३.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ पर्यंत प्रसृत करण्याबाबत आपणास विनंती आहे.

आपला विश्वासु,

**(प्रविणकुमार पडवळ)**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रत,

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष (पो.म.सं., कार्यालय), मुंबई.
२/- विधी निदेशकांच्या जागा भरण्यासाठी अर्जाचा नमुना व माहितीपत्रक सोबत जोडले आहे. सदरहू मसुदे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर कृपया प्रसिध्द करावेत. तसेच, सदरहू मसुदे दिनांक २३.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ या कालावधीसाठी संकेत स्थळावर ठेवावेत.

**अपर पोलीस महासंचालक**

प्रशिक्षण व खास पथके,

महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

शहिद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१, दि.२३.०४.२०२६

**-:विधी निदेशकांच्या जागा कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत:-**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पोलीस प्रशिक्षण केंद्रांच्या आस्थापनेवरील विधी निदेशक-

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ | - ७ जागा |
| २. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा | - ६ जागा |
| ३. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानविज दौंड | - ५ जागा |
| ४. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर | - ७ जागा |
| ५. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | - ७ जागा |
| ६. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | - ३ जागा |
| ७. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर | - ३ जागा |
| **८.** | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे | - १ जागा |
| **९.** | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची-सांगली | - ७ जागा |
| १०. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, लातूर | - ५ जागा |
| **११.** | प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक | - १ जागा |

**येथे ११ महिने कंत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.**

विधी निदेशक पदाची करारातील मासिक देय रक्कम/ विधी निदेशक यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या/अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना व अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र यांची माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे **www.mahapolice.gov.in** या संगणक संकेत- स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. वर दर्शविलेल्या पदसंख्येत/नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे त्याचप्रमाणे ते रद्द करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

**आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ०४.०५.२०२६**

सही/-

विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके,

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८ x १२

**-: अर्जाचा नमुना :-**

# पोलीस प्रशिक्षण केंद्रातील विधी निदेशक पदाकरिता अर्ज.

**नियुक्तीचे इच्छूक ठिकाण:-**

**कार्यालयीन उपयोगासाठी:**

१. अर्ज क्रमांक:-

२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक :-

३. अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह):-

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

**सूचना:- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.**

#अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत सुस्पष्ट समजेल अशा अक्षरात लिहावी.

*आवश्यक नसेल ते खोडावे.

(अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :-

| **१. अर्जदाराचे संपूर्ण नांव:-** | आडनाव | नाव | वडीलांचे/पतीचे नाव |
|---|---|---|---|
| **मराठीत** | | | |
| **इंग्रजीत** | | | |
| **२. पत्रव्यवहाराचा पत्ता पीनकोड सह:-** | | | |
| **३. कायमचा पत्ता पीनकोड सह:-** | | | |
| **४. दूरध्वनी क्रमांक :-** | लॅन्डलाईन | भ्रमणध्वनी | |
| | e-mail address | | |
| **५. जन्म दिनांक:-** | दिवस महिना वर्ष | **जन्म स्थळ:-** | |
| **६. दिनांक ०४.०५.२०२६ रोजीचे वय:-** | | वर्ष महिने दिवस | |
| **७. लिंग :-** | पुरुष / महिला | | |
| **८. धर्म:-** | **जात:-** | | |
| **९. सध्याचे नेमणूकीचे ठिकाण :-** | | | |
| १०. **महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ?** | | होय | नाही |

योग्य असेल तेथे ( ) अशी खूण करावी.

**(ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती**

**११. शैक्षणिक अर्हता:-**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) अथवा जुनी ११ वी परीक्षा. | | | | | |
| २. उच्च माध्यामिक शालान्त परीक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

**१२. इतर शैक्षणिक अर्हता:-**

संगणक प्रशिक्षित आहे काय? होय नाही.

**१३. अर्जदाराची इतर माहिती:-**

(अ) सनद घेतल्याचा दिनांक:-

(ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील:-

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

**टीप:- वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

१३-अ. अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना / निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ? होय नाही

१३-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय नाही

**(१३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)**

**-: अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र :-**

मी, श्री./सौ./कु.----------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच, मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण

दिनांक

अर्जदाराची सही
नांव व दिनांकासह

**सोबत:- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**

**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पोलीस प्रशिक्षण केंद्रांच्या आस्थापनेवरील विधी निदेशक यांच्या खालील जागा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पोलीस प्रशिक्षण केंद्रांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी निदेशक यांच्या जागा ११ महिन्यांच्या कंत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | भरावयाच्या जागा |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ | ७ |
| २. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा | ६ |
| ३. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानविज-दौंड | ५ |
| ४. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर | ७ |
| ५. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना | ७ |
| ६. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | ३ |
| ७. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर | ३ |
| ८. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे | १ |
| ९. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची तासगाव-सांगली | ७ |
| १०. | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, लातूर | ५ |
| ११. | प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक | १ |
| **एकूण** | | **५२** |

**सुचना-**

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात **विधी निदेशकाच्या जागेसाठी अर्ज** असे नमुद करुन दिनांक ०४.०५.२०२६ पर्यंत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, जुने विधानभवन, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०००01, (लक्षवेध- विशेष पोलीस महानिरीक्षक प्रशिक्षण व खास पथके) या पत्यावर पोहचेल याची दक्षता घेवून विहित नमून्यातील अर्ज सादर करावा. दिनांक ०४.०५.२०२६ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्र व्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत व आवेदन अर्जामध्ये ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

**टीप- वर दर्शविलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामध्ये बदल करण्याचे त्याच प्रमाणे ते रद्द करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.**

**करारातील मासिक देय रक्कम**

शासन निर्णय, गृहविभाग, क्र. डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१० दि.२१.०८.२०१८ मध्ये विहित केल्याप्रमाणे विधी निदेशक या पदाकरिता मासिक देय रक्कम रु.२०,०००/-+ दूरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रु.३,०००/-असे एकूण रु.२३,०००/- दरमहा देय राहतील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा/अनुभव**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल.

२. विधी निदेशक पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवारास संबंधित पदाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण ज्ञान असेल आणि तो संबंधित कायद्याचे प्रशिक्षण देण्यास सक्षम असेल.

४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. शासन निर्णय, गृहविभाग, एसपीपी-२००९/९२२/प्र.क्र.१०९/पोल-१०, दि.१८.६.२००९ नुसार विधी निदेशक पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

**किंवा**

६. जी व्यक्ती शासकिय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकिय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. **शासकिय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.**

**विधी निदेशकांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या:**

१. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण देणे.

२. पोलीस प्रशिक्षण शाळेत वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा परीक्षा तथा लेखी पारीक्षा यासाठी प्रश्नपत्रिका संच तयार करणे, परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे, परीक्षांचा निकाल तयार करणे इ. परीक्षाविषयक बाबीमध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशिक्षण) व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण शाळा यांना मदत करणे.

३. पोलीस प्रशिक्षणाविषयक सर्व बाबी तथा वेळोवेळी नेमूण दिलेली कामे.

**अटी व शर्ती:**

१. सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी/कर्मचाऱ्याना शासकिय अधिकारी /कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. उमेदवाराची निवड करतांना प्रथम ५० गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुकीसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नियुक्ती देण्यासाठी कमीत कमी ६० टक्के गुण असणे आवश्यक राहील.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यावसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याची लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा अर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. लेखी परीक्षेचा दिनांक व लेखी परीक्षेचे केंद्र ई-मेल द्वारे अवगत करण्यात येईल.

६. लेखी परीक्षा झाल्यानंतर लेखी परीक्षेमध्ये २० गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक व मुलाखत ज्या ठिकाणी होईल, त्याबाबतचे ठिकाण उमेदवारांना ई-मेल द्वारे कळविण्यात येईल.

७. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

८. नियुक्त केलेल्या उमेदवारास दि.१५.९.२००६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब नुसार करारनामा (Agreement) करणे अनिवार्य राहील.

९. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरीक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१०. उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी **अर्ज भरण्याच्या दिनांकास** पूर्ण करणे आवश्यक आहे.

११. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे (Passport Size Photo) सध्याचे काढलेले व स्वाक्षरी केलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

१२. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी निवड केलेल्या उमेदवारांना विधी निदेशक पदावर नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत नियुक्ती स्विकारणे क्रमप्राप्त आहे. उमेदवाराने त्याची विधी निदेशक पदावरील नियुक्ती स्विकारली नाही, तर त्याची नियुक्ती रद्द करण्यात येवून, प्रतिक्षा यादीवरील अन्य उमेदवाराची निवड करण्यात येईल, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

---------------